MARATHI

# रॉकस्टार इन ए साडी

पर्ल डी'सिल्वा
रेखाचित्रं : वसुंधरा अरोरा
अनुवाद : सुजाता देशमुख



एकलव्य

रॉकस्टार इन ए साडी
ROCKSTAR IN A SAADI

कथा : पर्ल डी'सिल्वा
रेखाचित्रं : वसुंधरा अरोरा
अनुवाद : सुजाता देशमुख

मराठी अनुवाद : एकलव्य फाउंडेशन, सितम्बर २०२३
लेखन : पर्ल डी'सिल्वा
हे पुस्तक Attribution-Non-Commercial-NoDerivatives 4.0 International (CC BY-NC-ND 4.0) लायसन्सच्या अंतर्गत आहे ज्याचे विवरण https:creativecommons.org/licecses/by-nc-nd/4.0/ वर उपलब्ध आहे.

वरीलप्रमाणे क्रिएटीव कॉमन्स लायसन्सअनुसार बिगर व्यावसायिक उद्देशाने मोफत वितरणासाठी या पुस्तकाचा कोणताही बदल न करता उपयोग केला जाऊ शकतो. तसे करताना मूळ स्रोताच्या लेखक आणि प्रकाशकाचा उल्लेख करून ते सूचित करणे गरजेचे असेल. अन्य कुठल्याही उपयोगासाठी प्रकाशकांच्या मार्फत लेखकांशी अवश्य संपर्क करा.

रेखाचित्रं © वसुंधरा अरोरा, सितम्बर २०२३

मूळ पुस्तक आणि त्याचा अनुवाद यांच्याकरता टाटा ट्रस्टच्या पराग इनिशिएटिव्हचे साहाय्य लाभले आहे.

पहिली आवृत्ती : सितम्बर २०२३ (2000 प्रती)
कागद : १०० जीएसएम मॅट आर्ट आणि मुखपृष्ठ 250 एफबी बोर्ड
ISBN : 978-81-963643-9-7
मूल्य : ₹ 105.00

हे पुस्तक इंग्रजीमध्ये *Rockstar in a Sari* आणि हिंदीमध्येही *रॉकस्टार इन अ साड़ी* नावाने, इकतारा ट्रस्ट, भोपाळ यांची मुद्रा असलेल्या जुगनू प्रकाशनने प्रकाशित केले आहे

एकलव्य फाउंडेशन
जमनालाल बजाज परिसर
जाटखेडी, भोपाळ 462 026 (मध्य प्रदेश)
Phone: +91 755 297 7770-71-72
Website: www.eklavya.in; Email: books@eklavya.in

मुद्रक : आर के सिक्युप्रिंट प्रा लि, भोपाल; फोन: +91 755 268 7589


# रॉकस्टार इन ए साडी

पर्ल डी’सिल्वा
रेखाचित्रं : वसुंधरा अरोरा
अनुवाद : सुजाता देशमुख



एकलव्य


उषा!
उषा! उषा!



पडद्याच्या फटीमधून मी हळूच डोकावते. एक खोल श्वास घेते आणि सावकाश रंगमंचावर पावलं टाकत जाते.

माझी अंगावरची गर्भरेशमी कांजीवरम साडी सळसळते.

आणि डोक्यातला भरगच्च गजरा किंचित झुलतो.

थाप जमलेले प्रेक्षक मला डोक्यावर घेतात. हसून, मी हातातल्या गिटारची तार छेडते.

कार्यक्रम मस्त रंगणार आहे!




माझं नाव उषा उथुप आणि मी गायिका आहे.

अगदी लहानपणापासून, मला फक्त गायचं होतं - गाणं एके गाणं!

पण काय गंमत. शाळेच्या गाणाऱ्या मुलांच्या गटात मला घेण्यात आलं नव्हतं, कारण माझा आवाज!







उषा बाळा, तुला ‘नाही’ म्हणणं माझ्या जिवावर येतंय, पण तुझा आवाज मोठा आणि घोगरा आहे, तो या सगळ्यांच्या आवाजाबरोबर जुळत नाही.

हे ऐकल्यानंतर माझी सर्वात आवडती गोष्ट, माझं स्वप्न मी उद्ध्वस्त होऊ दिलं म्हणता?

छे:!

मी निर्धारानं मान ताठ केली, हनुवटी वर उचलली आणि हवं तेच करत राहिले. म्हणजे जिथे शक्य होईल तिथे गात राहिले.



मुंबईत आम्ही लहानाचे मोठे होत असतांना, माझ्या बहिणींच्या गाण्याची तालीम मी बघत असे.

दोघीही लोकप्रिय गायिका होत्या.

त्यांच्यासारखी पॉप संगीत गायिका होण्याची आस मी मनोमन बाळगून होते.

माझ्या दिवसातली सगळ्यात सुंदर वेळ म्हणजे संध्याकाळ. आम्ही सगळेजण रेडियोभोवती कोंडाळं करीत असू.

संगीतानं संपूर्ण घर भारून जात असे.





अखेर तो क्षण आला. रेडियोवर कार्यक्रम करणाऱ्या माझ्या आवडत्या सादरकर्त्यांनी त्यांच्या कार्यक्रमात मला गायला बोलावलं. ‘मॉकिंग बर्ड हिल’ हे प्रसिद्ध इंग्रजी गाणं मी म्हटलं. अख्ख्या गावातली मी सगळ्यात आनंदी मुलगी होते आणि अखेर रॉकस्टार होऊ घातले होते...



मला गायिका व्हायचं आहे हे माझं पक्कं स्वप्न होतं. मी ते कधीच विसरले नाही. एका सार्वजनिक वार्षिक सुट्टीच्या दिवशी मद्रासमध्ये, रात्री उशिरापर्यंत सुरू असणाऱ्या एका 'नाईट क्लब' मध्ये मला माझी मावशी घेऊन गेली.

सगळीकडे स्वरांची जादू भरलेली होती. त्यांचा स्पर्श माझ्या अंत:करणाला होत राहिला.

तार सप्तकातल्या आणि मंद्र सप्तकातल्या प्रत्येक सुरानं माझ्यावर मोहिनी घातली होती.

माझ्याही नकळत मी माईक हातात घेऊन उभी राहिले.

संपूर्ण हॉल माणसांनी भरलेला होता, हेही मी विसरले. मी गायला सुरुवात केली.

माझ्या दुमदुमत्या आवाजानं हॉलचा कब्जा घेतला.

प्रेक्षकांनी हुर्रेची साथ दिली.


सगळ्या क्लबभर टाळ्यांचा नाद घुमला.

"पुन्हा गा" अशी सगळ्यांनी साद घातली.



इथे आहेस तोपर्यंत रोज गाशील का? अशी विचारणा तिथल्या व्यवस्थापकांनी केली.

माझं स्वप्न जणू प्रत्यक्षात उतरलं होतं.



माझ्या गाण्याची वाहवा कर्णोपकर्णी पसरत गेली आणि वेगवेगळ्या शहरातल्या ‘नाईट क्लब्स’ मधून मला आमंत्रणं येऊ लागली.

पण सगळ्यांनाच काही माझं गाणं आवडत नव्हतं.

काहींच्या मते तर माझा आवाज भयानक होता.

बाकीच्यांना माझा पोशाख पसंत नव्हता.

‘इंग्रजी गाणी आणि तीही साडीत?’ ते म्हणायचे.

‘शिवाय बांगड्या आणि कुंकू?’






भारतातल्या अनेक शहरांत मी गायले. मात्र माझं हृदय कायमचं काबीज केलं, ते कलकत्त्यानं.

इथे गायला सुरुवात केली आणि मला मनोमन कळलं, की हेच माझं घर.







आणि मी ते केलंही. इथे मी गात राहायला सुरुवात केली, तशी मला सगळ्यांकडून अधिकाधिक प्रेम मिळू लागलं आणि मीही या शहराच्या वाढत्या प्रेमात पडले.

शूशश! मी तुम्हाला एक गुपित सांगणार आहे. माझ्या कुंकवाच्या टिकलीकडे निरखून पाहिलंत, तर तुम्हाला बंगाली भाषेतला ‘क’ दिसेल. तो ‘कलकत्त्या’तला ‘क’ आहे. इथे मी गेल्या चाळीस वर्षांहून अधिक काळ राहते आहे.





माझ्या गाण्यानं मला जगाची सफर घडवून आणली आहे. तब्बल पंधरा भारतीय भाषांमधून आणि आठ परदेशी भाषांमधून मी गाणी म्हटली आहेत.

पोवाडे, आत्मसंगीत, जॅझ, पॉप, रॉक किंवा बॉलीवूडची गाणी.



गातांना मी साडीच का बरं नेसते, असं विचारताय?

सोपं आहे, मला आवडतं.

लहानपणापासून माझ्या आईला आणि बहिणींना साड्यांमध्ये मिरवतांना मी पाहिलं आहे. त्यातून माझं साडीवरचं प्रेम वाढतच गेलं.

साड्यांमध्ये माझा सगळ्यात आवडता प्रकार कांजीवरम आहे. त्या भारदस्त दिसतात. मोठाले काठ आणि उत्तम रेशमी.

माझ्याबरोबर त्या सळसळतात.

त्या नेसल्यावर मला महाराणी असल्यासारखं वाटतं.

प्रत्येक वेळी त्या नेसून मी गायला उभी राहिले, की मी, 'मी' होते ....




रॉकस्टार
इन ए साडी!



एके दिवशी एक कार्यक्रम तासन तास चालला. माझ्या थकलेल्या पावलांकडे माझी नजर गेली. ‘पायाला  आराम मिळेल असं काही घालता आलं, तर किती छान.’ माझ्या मनात विचार डोकावला.

अस्वस्थ मनानं माझा साडीशी चाळा सुरू होता. आणि माझ्या मनात एक कल्पना चमकली. माझी एक जुनी साडी मी फाडली आणि तिचे तुकडे मी माझ्या मऊशार जोड्यांवर शिवले.

आता कांजीवरम पद्धतीचे माझे आरामदायी जोडे डोळ्यांना कदाचित खटकत असतीलही, पण ...

तीच तर ‘मी’ आहे.









हीच माझी खरी ओळख!

# रॉकस्टार इन ए साडी



**उषा उथुप**

उषा उथुप यांचा जन्म १९४७ साली मुंबईतल्या भायखळ्यात झाला. आईवडील आणि बहिणी यांच्यासोबत एका साध्या घरात त्या राहत असत. उमा आणि इंदिरा नावाच्या त्यांच्या बहिणी, 'सामी भगिनी' या नावानं व्यावसायिक गायिका म्हणून आधीच प्रसिद्ध झाल्या होत्या. उषा त्यांच्या विशिष्ट शैलीसाठी ओळखल्या जातात. कांजीवरम साड्या, केसांत भरपूर गजरे, भरगच्च बांगड्या आणि कपाळावर मोठं कुंकू!

भारतात आणि परदेशातही उषा उथुप यांचा यशस्वी गायिका म्हणून नावलौकिक झाला. अतिशय सफाईनं त्या पंधरा भारतीय भाषांतून आणि आठ परदेशी भाषांतून गाऊ शकतात. बॉलीवूडच्या चित्रपटांसाठीही त्यांनी पार्श्वगायन केलं आहे. पुरुष आणि स्त्री अशा दोन्ही अभिनेत्यांसाठी त्यांनी आपला आवाज दिला आहे.

२०११ साली, 'डार्लिंग, आंखों से आंखे चार करने दो' या गाण्यासाठी 'सर्वोत्तम पार्श्वगायिके'चा फिल्मफेअर पुरस्कारही त्यांना मिळाला आहे.

माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी, दक्षिण आफ्रिकेचे नेते दिवंगत नेल्सन मंडेला, दिवंगत मदर तेरेसा यांच्यासाहित अनेक देशांचे अध्यक्ष, पंतप्रधान यांच्यासाठी उषा गायल्या आहेत. नैरोबीचे अध्यक्ष जोमो केन्याटा यांनी उषा यांना केनयाचं सन्माननीय नागरिकत्व बहाल केलं आहे.

कार्यक्रम नसतील, तेव्हा उषा यांना वाचायला आवडतं. फिरतीवर असतांना त्यांच्याजवळ हमखास पुस्तक असतंच. त्यांना शिवणकामही आवडतं आणि त्या अनेकदा स्वत:चे कपडेही शिवतात. मानवी अधिकार हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. लोकांना सक्षम करण्यावर त्यांचा विश्वास आहे आणि त्यांनी आत्मनिर्भर व्हावं यासाठी त्या संधी उपलब्ध करून देतात. अगदी नुकतंच त्यांनी बिहारमधल्या निष्णात चांभारकाम करणाऱ्या दोघांना आपले अतिशय हटके कांजीवरम जोडे करण्याचं काम दिलं.

अभिनेते, गायक फरहान अख्तर यांच्या शब्दांत सांगायचं झालं, तर त्या खरोखरीच - **रॉकस्टार इन ए साडी** आहेत!

### पर्ल डी'सिल्व्हा

लहान मुलांच्या बाल्यावस्थेतल्या शिक्षणाचं काम पर्ल डिसिल्व्हा करतात. लहानपणापासूनच त्यांना लेखक होण्याची आस होती. किती? तर वयाच्या सहाव्या वर्षापासून त्यांनी आपल्या वह्या कथांनी आणि रेखचित्रांनी गिरमटून टाकल्या होत्या. मूळच्या मुंबईकर असलेल्या पर्ल आपल्या कुटुंबीयांबरोबर न्यूझीलंड मध्ये राहतात.

pearlmascarenhas@gmail.com

### वसुंधरा अरोरा

भारतातल्या नवी दिल्ली इथे राहणाऱ्या वसुंधरा अरोरा रेखाचित्रकार आहेत. वाढत्या वयातच चित्रकलेच्या क्षेत्रातली त्यांची रुची वाढत गेली. बडोद्याच्या 'महाराजा सयाजीराव विद्यापीठा'तून त्यांनी चित्रकलेत पदवी मिळवलेली आहे. २०२१ साली, केरळमधल्या कोची इथे 'कोची स्टुडंट्स बिनाले' या प्रदर्शनात वसुंधरा यांचं 'इम्पर्सोनेशन' मथळ्याचं चित्र प्रदर्शित करण्यात आलं होतं. त्यावेळी त्या पदवीच्या अंतिम वर्षात शिकत होत्या. वसुंधरा यांना प्रामुख्यानं जलरंगात काम करायला आवडतं. परंतु आता त्यांनी नव्या प्रकारची रेखाचित्रं निर्माण करण्यासाठी डिजिटल माध्यमाचाही आपल्या शैलीत वापर करायला सुरुवात केली आहे. त्यांच्या चित्रांत एक शांत कथाभाव असतो. त्यातून त्या सूक्ष्म भाव भावना प्रकट करतात. निसर्ग त्यांना भुरळ घालतो आणि सतत स्वत:ला प्रश्न पडत राहिल्यामुळे त्यांच्या रेखाटनामधला खरेपणा जिवंत राहतो.

vasundharaa999@gmail.com

‘रंगमंचावर आपण उभे आहोत’ असं स्वप्न उराशी बाळगणारी ही छोटी उषा! आगळावेगळा आवाजाचा पोत आणि निरनिराळ्या भाषेत गाण्याचं सांगीतिक प्रतिभेचं लेणं ल्यालेली उषा पुढे प्रख्यात ‘साडीतली रॉकस्टार’ म्हणून गाजली.

इकतारा ट्रस्ट की प्रकाशन छाप

parag
AN INITIATIVE OF TATA TRUSTS

मूल्य : ₹ 105.00

9 788196 364397

एकलव्य